कविता

## रे तथागता

अहिंसा हवी होती तुला
डोळाभर करूणा
अन् हृदयभर प्रेमही

माहीत नव्हतं तुला
याचीच अस्त्रं बनवून
लढतील लोक एकमेकांशी

सतत तुला
पाषाणी ध्याननिंद्रेत ठेवूनच
उच्चारली जातेय तुझी ज्ञानवाणी

मावला नाहीस तू
आकाश आणि जमिनीच्या
मधोमध असणाऱ्या पोकळीत

म्हणत राहिलास
'मी तुम्हाला मार्ग दाखवतो
मुक्तीची साधना मात्र तुम्हीच करा'

कळले नाही काहीच
अन् अधांतरीच तरंगत राहिले सगळे
तू मात्र हसतोय निर्वाणानंतरही

रे तथागता,
मला हवीय ती सुजाताची खीर
अन् चुंद लोहाराची भिक्षा

खरच मी मुक्त, विमुक्त
होऊ म्हणतोय
माझाच मी प्रकाशण्यासाठी

**अशोक कोतवाल**
जळगाव

## तू दिसतेस मला

तू दिसतेस मला मंदिराबाहेरच नेहमी
तुझ्या वाट्याला आलेल्या अखंड ग्रीष्मात
आलेला दिवस अंगावर घेऊन
तुझ्यावर लादलेल्या सक्त मजूरीची
शिक्षा भोगत असतेस
अनवानी पायानं रानावनात
मोळीसाठी भटकताना दिसतेस
कधी पाठीवर तान्हुलं बांधून
खडी वाहून नेत असतेस भर उन्हात
पोटाची आग विझवण्यासाठी
सूर्याच्या आगीवर मात करतेस
तू दिसतेस कोपऱ्यावर भाजी विकताना
विना सावलीची
घामानं थबथबलेलं तुझं तेजाळ रूप
अजूनच मोहक दिसतं
त्यावर रोखलेले असतात
अनेक विंचवांचे डंख भरलेले डोळे
हॅप्पी होमच्या भिंतीआड
विस्कटलेलं आयुष्य सावरताना
आपल्याच तप्त श्‍वासात होरपळत असतेस
आतल्या आत खोलवर
तू बसस्टॉपच्या प्लॅटफॉर्मवर बसलेली लेकरांनी टाकलेली
रंग उडालेल्या जुनेऱ्यासारखा चेहरा
सृष्टीचं कारूण्य तुझ्या डोळ्यात उतरलेलं असतं!
तू दिसतेस मला...

**छाया बेले**
नांदेड


प्रकाशन दिनांक १६-११-२०१७